# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १२३/२०२०/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राहुल चंद्रकांत भारती,<br>रा.२०, श्रीजी अर्पण, इंदिरा नगर,<br>नाशिक, ता.जि.नाशिक-०९. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>उप कार्यकारी अभियंता,<br>इवद विभाग क्र.१, बांधकाम विभाग,<br>जिल्हा परिषद नाशिक, ता.जि.नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>कार्यकारी अभियंता,<br>इवद विभाग क्र.१, बांधकाम विभाग,<br>जिल्हा परिषद नाशिक, ता.जि.नाशिक. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक – १७/१२/२०२१**

अपिलार्थी यांनी दिनांक ३०/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक १७/१२/२०२१ रोजी meet.google.com/idp-upcd-kdt या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा

कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल."

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे, असे आयोगास वाटते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २१/०९/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांचा दिनांक २१/०९/२०१९ रोजीचा माहिती अर्ज दिनांक ०४/१०/२०१९ रोजी संकलनास प्राप्त झाला होता. याद्वारे त्यांनी दिनांक १३/०८/२०१९ ते दिनांक २१/०९/२०१९ या कालावधीतील धुळवड ते रामोशीवाडी (ता.सिन्नर) रस्त्याच्या कामाची चौकशी करणे तसेच खालील सर्व बाबींची योग्य चौकशी करुन कार्यवाही करणेबाबत अपिलार्थी यांनी दिनांक १३/०८/२०१९ रोजी केलेल्या ई-मेलद्वारे तक्रारीच्या अनुषंगाने कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहितीशी संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा संकलन-लेखा-६, इवद-१, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे वर्ग करुन माहिती पुरविणेबाबत कळविले. व तसे अपिलार्थीस अवगत केले. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०५/११/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०५/११/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९/११/२०१९ रोजी निर्णय पारीत करुन अपिलार्थी गैरहजर राहिलेले आहेत त्यांना माहिती देणे क्रमप्राप्त असल्यामुळे त्यांना माहिती देवून अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे, असे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे नमुद केले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २१/०९/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस दिनांक १२/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये विलंबाने माहिती पुरविली असल्याचे स्पष्ट होते. तसेच अपिलार्थी यांनी देखील सुनावणीदरम्यान माहिती प्राप्त झाली असून तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, इवद विभाग क्रमांक-१, जिल्हा परिषद नाशिक, श्रीमती आर.एन.आहेर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २१/०९/२००१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष व टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १२३/२०२०/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, ता.जि.नाशिक.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्रीमती आर.एन.आहेर (तत्कालीन जन माहिती अधिकारी) उप कार्यकारी अभियंता, इवद विभाग क्र.१, जिल्हा परिषद नाशिक, ता.जि.नाशिक.